दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १०० वा शनिवार दि.२१ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## लातूर तालुक्यातील सेलू, धनेगावात महिला मेळावा महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मतदारांच्या अपेक्षा काँग्रेस पक्षच पुर्ण करु शकतो

### मांजरा परिवारामुळे शेतकजयांत अर्थक्रांती

विकासरत्न विलासराव देशमुख यांनी ४० वर्षांपुर्वी चिंचोलीरावच्या माळरानावर मांजरा सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. आज मांजरा साखर परिवारातील १० ते १२ साखर कारखाने शेतकजयांच्या सेवेत कार्यरत आहेत.ऊस उत्पादक शेतकजयांच्या ऊसाला सर्वाधिक दर देऊन शेतकजयांच्या जीवनात मांजरा परिवाराने अर्थक्रांती घडवली आहे.शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, महीला या सर्वांच्या आशिर्वादामुळेच हे शक्य झाले आहे.सर्वांनी आपला आशिर्वाद आमादर धिरज देशमुख यांच्या पाठिशी कायम ठेवावा, असे आवाहन यावेळी बोलताना रीड लातूरच्या संस्थापिका सौ.दीपशिखा धिरज देशमुख यांनी केले.




लातूर / प्रतिनिधी :- सर्व समान्यांना सत्तेचा वाटा मिळाला पाहिजे, त्यांचा आर्थिक स्तर उंचावून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणने, हा काँग्रेस पक्षाचा विचार आहे.त्या विचाराचे पाईक म्हणून आमदार धिरज देशमुख लातूर ग्रामीण मतदारसंघात सातत्याने विकासाच्या योजना खेचून आणत असून मतदारांच्या अपेक्षा केवळ काँग्रेस पक्षच पूर्ण करु शकतो. त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी आमदार धिरज देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणाने उभे राहावे, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.लातूर तालुक्यातील सेलु (बु) व धनेगाव येथे दि.२० संप्टेंबर रोजी महिला बचत गटांचा मेळावा घेण्यात आला.त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांशी संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ.दीपशिखा धीरज देशमुख, डॉ. सारीकाताई देशमुख, सुनिता अरळीकर, जयश्री बरमदे, कृषी उत्पन्न बाजार समीतीचे संचालक युवराज जाधव, रेणा साखर कारखान्याचे संचालक ॲड. प्रविण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या कि, नुकत्यास संपलेल्या लोकसभेच्या निवडुकीत मतदारांनी भाजपा महायुतीला धडा शिकवत काँग्रेस महाविकास आघाडीला भरभरुन मतदान केले.काँग्रेस महाविकास आघाडीवर मतदारांनी विश्वास व्यक्त केले.तब्बल १० वर्षांनंतर डॉ.शिवाजी काळगे यांच्या रुपाने लातूर लोकसभेत काँग्रेस महाविकास आघाडीचे खासदार निवडून आले. विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार धिरज देशमुख यांच्या प्रयत्नातून लातूर लोकसभेच्या विडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडीचा मोठा विजय झाला.आगामी विधानसभा निवडणुकीतही मतदारांनी काँग्रेस महाविकास आघाडीला शक्ती द्यावी, असे आवाहन केले. देशातील गोर-गरीबांना १५ लाख रुपये देण्याचे अमिष भाजपाच्या नेत्यांनी दाखवले होते.त्यातील एक छदामही गरीबांना मिळाला नाही, असे नमुद करुन श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या महायुतीने मतदारांना खोटी आश्वासने देऊन मतदारांची घोर निराशा केली.शेतकऱ्याच्या शेतीमालाला भाव नाही, तरुणांच्या हाताला काम नाही, महिलांची सुरक्षा नाही, आरोग्याच्या सुविधा नाहीत. एकेकाळी प्रगत असलेला महाराष्ट्र या महायुती सरकारच्या भ्रष्ट कारभारामुळे आज रसातळाला गेला आहे. त्यामुळे मतदारांनी या महायुतीला आता धडा शिकवावा, असेही त्यांनी सांगीतले.

याप्रसंगी भाग्यश्री दोरवे, उज्वलाबाई सांडूर, वैशालीताई पाटील, मीरा जाधव, रोहिनी सांडूर, अनिता सांडूर, अनुसया सांडूर, उज्वला सुरवसे, शिवकन्या बेवणाळे, इंदुबाई सुरवसे, सारिका सांडूर, रुपाबाई सांडूर, मैणा सांडूर, सरस्वती सांडूर, सविता सांडूर, बालणबाई सांडूर, जनाबाई सांडूर, गीता सांडूर, मीराबाई बावणे, सुभद्रा घोडके, बालीका चेवले, कौशल्या थोरमोटे, विमल बेंबडे, सुशीला कोळेकर, मणकर्णा गायकवाड, जयश्री हाळे, रब्बाना शेख, पद्मीनी पांढरे, उर्मिला पांढरे, शालुबाई कोळेकर, महानंदा कोळेकर, कांताबाई शेळके, हरीबाई हाळे, गंगाबाई पाटील, सुमनबाई पाटील, विठाबाई पांचाळ, शारुबाई फावडे, लक्ष्मी मेकले यासह आदी महिला उपस्थित होत्या.

## नितेश राणेंच्या प्रक्षोभक विधानांना लगाम लागणार?

मुंबई : विधानसभा निवडणुका येऊ घातल्या आहेत. यापार्श्वभूमीवर भाजपचे आमदार नितेश राणे हे सध्या विविध व्यासपीठांवर थेट मुस्लिमविरोधी भूमिका घेऊन प्रक्षोभक विधान करत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धार्मिक ध्रुविकरणाच्या त्यांच्या प्रयत्नांना आता लगाम लागण्याची शक्यता आहे. कारण खुद्द महायुतीतील अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने नितेश राणेंविरोधात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सविस्तर पत्राद्वारे तक्रार केली आहे.



औरंगाबाद पदवीधर मतदारसंघातील राष्ट्रवादीचे आमदार सतीश चव्हाण यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यासंदर्भात पत्राद्वारे तक्रार करुन कडक कारवाईची विनंती केली आहे. त्यांनी पत्रात म्हटले की, महाराष्ट्रात येत्या दोन महिन्यात विधानसभा निवडणुका येऊ घातल्या आहेत. या पार्श्वभूमीवर केवळ स्वत:चे राजकारण करण्यासाठी भाजपचे आमदार नितेश राणे हे सातत्याने मुस्लिम समाजाबद्दल आणि त्यांच्या धार्मिक स्थळांबाबत सातत्याने वादग्रस्त विधाने करत आहेत. यामुळे मुस्लिम समाजात संतापाची भावना आहे. याबाबत नितेश राणे यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल झालेला आहे असे असताना देखील ते पुन्हा तशाच स्वरुपाची विधाने करत आहेत. यामुळं दोन्ही समाजात धार्मित तेढ निर्माण होईल अशी सामाजिक परिस्थिती तयार होण्याची शक्यता आहे. त्यातून गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात यावेत. तसेच भाजपच्या शीर्ष नेतृत्वानं देखील त्यांच्या समाजविघातक वक्तव्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी, अशा शब्दांत पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांनी फडणवीसांसह भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना नितेश राणे यांच्यावर कारवाईबाबत भूमिका मांडली आहे.

## प्रधानमंत्री मा.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नाथ शिक्षण संस्था संचलित वैद्यनाथ विधी महाविद्यालयाच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे दूरदृश्य प्रणाली व्दारे उद्घाटन

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- व्यावसायिक शिक्षणातून कौशल्य विकास या संकल्पनेचा फायदा अधिकाधिक युवक-युवतींना होण्यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये नाथ शिक्षण संस्था संचलित वैद्यनाथ विधी महाविद्यालय परळी वैजनाथ या ठिकाणी दूरदृश्य प्रणाली द्वारे देशाचे प्रधानमंत्री मा.श्री.नरेंद्र मोदी साहेब आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन संपन्न झाले.

कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्हावा, या दृष्टिकोनातून प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर आचार्य चाणक्य कौशल्य केंद्र स्थापनेसाठी महाराष्ट्र शासनाने परळी वैजनाथ येथील महाराष्ट्र राज्य कृषीमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ शिक्षण संस्था संचलित वैद्यनाथ विधी महाविद्यालयाची निवड केली आहे. नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे व समनव्यक प्राचार्य अतुल दुबे यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे



आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २० सप्टेंबर रोजी व्र्हच्युअल ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. यावेळी परळी नायब तहसीलदार पठाण मॅडम, समनव्यक प्राचार्य अतुल दुबे, प्रा. किरण शिंदे, प्राचार्य कदरकर सर तसेच विद्यार्थ्यांचे विशेष उपस्थिती होती.

## मराठा क्रांती मूक मोर्चा; आठ वर्षे सरली आरक्षण नाही

लातूर : प्रतिनिधी १९ सप्टेंबर २०१६ रोजी लातूर जिल्ह्यात एक मराठा लाख मराठा या जाणीवेने एकत्र येत मूक मोर्चाच्या माध्यमातून सकल मराठा समाजाने मराठा आरक्षणासाठी शासनास विनंती केली होती तथापि एवढा प्रदीर्घ कालावधी उलटुनही हा प्रश्न मार्गी न लावल्याने सत्ताधारी व विरोधक दोघांचाही लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने निषेध करण्यात आला. मराठा आरक्षण योद्धे मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांचे समर्थन करीत मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण देण्यात यावे तसेच निजाम गॅझेट लागू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. लातूर मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने लातूर येथे काढण्यात आलेल्या मूक मोर्चास १९ सप्टेंबर २०१४ रोजी आठ वर्ष पूर्ण झाले. त्या औचित्यावर घेण्यात आलेल्या बैठकीत मराठा आरक्षणासाठी जिल्ह्यात करण्यात आलेल्या विविध आंदोलनाच्या संदर्भाने मंथन करण्यात आले. मराठा समाजाची स्थिती अत्यंत हलाखिची असून समाजातील बहुसंख्य बांधवांना रोजचा दिवस काढणे कसरतीचे झाले आहे. आरक्षणाअभावी युवक-युवतींची परवड होत आहे. पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च पालकांना परवडत नसल्याने अनेकांना अर्ध्यावर शिक्षण सोडण्याची वेळ आली आहे. शिकुनही नौकरी मिळत नसल्याने हतबलतेने अनेक युवकांनी आत्महत्या केल्या आहेत. आर्थिक हतबलतेने अनेक पालकांनी मरणाला कवटाळले आहे. अशा घटना अजुनही घडतच आहेत. हे सारे थांबवण्यासाठी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले पाहीजे व ते मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसायचे नाही, असा निर्धार यावेळी समाजबांधवांनी केला.

## भास्करराव पाटील खतगावकरांची समर्थकांसह काँग्रेसमध्ये घरवापसी

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपाला नांदेडमध्ये मोठा धक्का बसला आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपा नेते अशोक चव्हाण यांचे नातेवाईक आणि माजी खासदार भास्करराव पाटील खतगांवकर यांनी त्यांच्या समर्थकांसह आज काँग्रेसमध्ये घरवापसी केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत भास्करराव पाटील खतगावकर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.



भास्करराव पाटील खतगावकर यांच्यासह माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा आणि मीनल पाटील खतगावकर यांनीही पुन्हा एकदा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबईतील टिळक भवन येथे झालेल्या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमात नांदेडचे माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, युवा नेत्या डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते आणि माजी मंत्री अमित देशमुख यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. दरम्यान, नांदेड जिल्ह्यामधील नायगाव विधानसभा मतदारसंघातून मीनल पाटीलल खतगावकर यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. माजी मुख्यमंत्री आणि भाजपा खासदार अशोक चव्हाण यांचे नातेवाईक आणि माजी खासदार भास्करराव खतगावकर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने हा भाजपासाठी मोठा धक्का मानला जात आहे. अलीकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत नांदेडमध्ये भाजपाचा पराभव झाला. अशोक चव्हाण यांच्या भाजपा प्रवेशानंतर भास्करराव खतगावकर, त्यांच्या सुनबाई मीनल खतगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्यासह काँग्रेसच्या अनेकांनी भाजपाचे कमळ हाती घेतले होते. तरीही नांदेडमध्ये काँग्रेसचे खासदार निवडून आले होते.



वाघोली गावचे माजी सरपंच नियोजन समितीचे सदस्य संजय आप्पा सातव पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला यावेळी सचिन साठे अंबादास साळुंखे नितीन हातागळे दीपक पोळ गणेश जाधव शंकर वराळे विष्णू ढाकले वाघेश्वर नगर मधील उपस्थित सर्व नागरिक व सर्व मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते संपन्न झाला

## आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून भिसे वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर

लातूर :- लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला भारतीय जनता पार्टीचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्यातील महायुती शासनाने दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे भिसे वाघोली आणि परिसरातील रुग्णांची मोठी सोय होणार आहे.

ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित व्हावे यासाठी भाजपाचे नेते आ, रमेशआप्पा कराड यांनी राज्यातील महायुती शासनाचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ, तानाजी सावंत यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून ग्रामीण भागाची गरज लक्षात घेऊन महायुती शासनाच्या निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी दिली आहे.

लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाल्याने भिसे वाघोली सह भोसा, वाडीवाघोली, निळकंठ, शिराळा, येळी, पिंपरीआंबा, माटेफळ, करकटा, खुंटेफळ, बोरगाव, हिसोरी, खंडाळा आदी आजूबाजूच्या अनेक गावातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सदरील आरोग्य केंद्र मंजूर व्हावे यासाठी विशेष प्रयत्न करून मंजुरी मिळवून घेतल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संभाजी वायाळ, सरपंच सौ. स्वंयम वायाळ, भैरवानाथ पिसाळ, शामसुंदर वाघमारे, बाबा भिसे, सुरज शिंदे, विश्वास कावळे, काशीनाथ ढगे, रशिद पठाण, योगीराज साखरे, काकासाहेब पाटील, बाबासाहेब देवकर, नामदेव मांडे, संदीप भुजबळ, तात्यासाहेब औताडे, सुधाकर नाना काळे, धनंजय जाधव, अरविंद पारवे, सचिन सवई, राहूल काळे, संदीपान काळे, बालाजी नाईकवाडे, भाऊसाहेब भिसे, शुभम खोसे, सचिन हींगे, नवनाथ भिसे, राहूल भिसे, प्रदिप शिंदे, राजाभाऊ मरे, बालाजी शिंदे, विष्णू महानवर, श्रीमंत शिंदे, काकासाहेब साखरे, जणाबाई साखरे, शिवाजी आडसूळ, विश्वनाथ शिंदे, मधुकर शिंदे, अरुण शिंदे, शिवराम शिंदे यांच्यासह भिसे वाघोली आणि त्या परिसरातील भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आभार व्यक्त केले आहे.



दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# सत्य शोधण्याचा मार्ग

गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलिस आणि तपास यंत्रणा विविध पद्धतींचा अवलंब करत असतात. यामध्ये अलीकडील काळात पॉलिग्राफ चाचणीही केली जाते. याचा प्रयोग पहिल्यांदा १९ व्या शतकात इटलीतील गुन्हे संशोधक सेसारे लोम्ब्रोसो यांनी केला होता. त्यानंतर १९१४ मध्ये अमेरिकी मानसशास्त्रज्ञ विल्यम मेरस्ट्रॉन आणि १९२१ मध्ये कॅलिफोर्नियाचे पोलिस अधिकारी जॉन लार्सन यांनीही अशाच प्रकारचे उपकरण तयार केले. कोलकाता येथील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी आता संशयितांची पॉलिग्राफ चाचणी केली जात आहे. यानिमित्ताने पॉलिग्राफ चाचणीने या प्रकरणाचा गुंता कसा उलगडू शकतो आणि ही चाचणी कशा रीतीने मदत करते, हे जाणून घेणे औचित्याचे ठरेल. एखाद्या गुन्ह्याचा शोध लवकर लागत नसेल तर पोलिस यंत्रणा विविध माध्यमांतून आरोपींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असतात. हत्या, बलात्कार, चोरी, दरोडा, फसवणूक, अपहरण, खंडणी, दहशतवादी हल्ला यासारख्या गुन्ह्यांत काही वेळा तपास लवकर लागतो, तर काही वेळा सहजासहजी पुरावे हाती लागत नाहीत. अशावेळी नार्को टेस्ट, पॉलिग्राफ चाचणी किंवा क्राईम सीन याद्वारे शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. आर. जी. कर महाविद्यालयाच्या प्रकरणाने देशभरात खळबळ उडाली असताना सीबीआयने ४ कर्मचार्यांची पॉलिग्राफ चाचणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यात पहिल्या वर्षात शिकणारे पीजीटी डॉक्टर अर्का व सौमित्र यांचा समावेश आहे. शिवाय एक हाऊस स्टाफ गुलाम व एक इंटर्न सुभदीप याचाही समावेश आहे. पॉलिग्राफ चाचणी या प्रकरणाचे रहस्य कशा प्रकारे उलगडू शकते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. फॉरेन्सिक सायकॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पुनीत पुरी यांच्या मते, पॉलिग्राफ चाचणीसाठी कोर्टाकडून परवानगी घ्यावी लागते. पॉलिग्राफ चाचणी ही नार्को चाचणीपेक्षा वेगळी असते. यात आरोपीला बेशुद्ध करण्याचे इंजेक्शन दिले जात नाही. उलट कार्डिओ कफसारख्या मशिनचा वापर केला जातो. या मशिनच्या माध्यमातून रक्तदाब, नाडी, श्वास, घाम, रक्तप्रवाह यांचे आकलन केले जाते. यानंतर आरोपीला प्रश्न विचारण्यात येतात. खोटे बोलल्यास तो भयभीत होतो आणि त्याचवेळी मशिन हे शरीरातील बदल हेरते. २०१० मध्ये एका खटल्याच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाच्या मतानुसार पॉलिग्राफ चाचणीवेळी आरोपींनी मांडलेली मते ही पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार नाहीत. उलट ते पुरावे गोळा करण्याचा एक मार्ग राहू शकतो. असे समजा की, जर पॉलिग्राफ चाचणीत हत्या प्रकरणातील आरोपी गुन्ह्यात वापरलेल्या शस्त्राचे ठिकाण सांगत असेल तर त्याला पुरावा मानता येणार नाही; परंतु आरोपीने सांगितलेल्या ठिकाणी शस्त्र सापडत असेल, तर त्याला पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाईल. पण, न्यायालय असेही म्हणते की, अशा चाचण्यांच्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीच्या खासगी आयुष्यात मानसिक प्रक्रियेद्वारे जबरदस्तीने घुसखोरी करणे हे त्याच्या स्वातंत्र्याच्या व मूलभूत हक्काच्या विरोधात आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या परवानगीनंतरच अशा प्रकारची चाचणी करण्यास परवानगी दिली जाते. एका पॉलिग्राफ मशीनमध्ये सेन्सरयुक्त अनेक भाग असतात. सेन्सरने नोंदवलेल्या सर्व माहितीची एकाचवेळी पडताळणी केली जाते व त्याचा सायकॉलॉजिकल रिस्पॉन्स शोध घेण्यात येतो. एखादी व्यक्ती खोटे बोलत असेल तर तिच्या मनात धाकधूक वाढते. या पद्धतीचा वापर कसा केला जातो? न्यूमोग्राफ : व्यक्तीच्या श्वास घेण्याच्या पॅटर्नचे आकलन करून श्वास घेण्याच्या प्रक्रियेतील बदल जाणून घेतला जातो. कर्डिव्हस्क्युलर रेकॉर्डर : एखाद्या व्यक्तीच्या हृदयाचे ठोके आणि रक्तदाबाचे आकलन केले जाते. गेल्वेनोमीटर : मशीनच्या स्क्रीनवर येणार्या घामाच्या ग्रंथींतील बदलाचे आकलन करते. रेकॉर्डिंग डिव्हाईस : पॉलिग्राफ मशिनच्या सर्व सेन्सरने मिळणारा डेटा रेकॉर्ड करत त्याचे विश्लेषण करते. कंट्रोल क्वेश्चन टेस्ट : सर्वात पहिले म्हणजे व्यक्तीला पॉलिग्राफ मशिनला जोडल्यानंतर त्याला सामान्य प्रश्न विचारले जातात. या प्रश्नांची उत्तरे होय किंवा नाही अशी असतात. जेव्हा तो एखाद्या सामान्य प्रश्नाचे उत्तर देतो आणि त्याच घटनेतील एखाद्या कठीण प्रश्नाचे उत्तर देतो, तेव्हा या दोन्हीतील फरक जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. उत्तर देताना शरीराची प्रतिक्रया समजून घेतली जाते. यावेळी श्वास घेण्याची गती, नाडी, रक्तदाब, घाम यावरून एखादी व्यक्ती खरे बोलत आहे की खोटे, हे समजून घेतले जाते. गिल्टी नॉलेज टेस्ट : या प्रश्नांत अनेक प्रकारची उत्तरे असतात. सर्व प्रश्न गुन्ह्याशी संबंधित असतात. उदा. एखादा आरोपी चोरी प्रकरणात पकडला जातो, तेव्हा त्याला अनेक प्रकारचे प्रश्न विचारले जातात. पाच हजार, दहा हजार, पंधरा हजारांची चोरी केली का? या प्रश्नाचे उत्तर त्याने अचूक दिले तर त्याच्या हृदयाचे ठोके बरोबर पडतील; परंतु खोटे बोलताना त्याच्या शारीरिक क्रिया वेगवान होतील. तो काहीतरी लपवत आहे, हे तत्काळ समजेल. अमेरिकी मानसशास्त्र संघटनेच्या मते, चौकशीदरम्यान शरीरात मानसिक बदल होतो व यावरून तो खरे बोलत आहे की खोटे, हे निश्चित सांगता येत नाही; पण एखादे सत्य शोधून काढण्याचे ते माध्यम राहू शकते. 'वंडरपोलिस'च्या अहवालानुसार, एखादी व्यक्ती आपल्या भावनेवर नियंत्रण ठेवत असेल तर तिच्यावर अशा चाचणीचा फारसा परिणाम होत नाही. एवढेच नाही, तर आरोपीने दिलेले उत्तर तज्ज्ञ खोटे असल्याचे सांगून त्याच्यावर दबाव टाकू लागले तर तो नर्व्हस होऊ लागतो. अशावेळी तो नर्व्हस झाला तर तो खोटे बोलत असल्याचे गृहीत धरले जाते.

# २१ सप्टेंबर विश्व शांती दिवस

विषय:- भारत विश्र्व शांतीचे उगमस्थान व आधारस्तंभ जगात भारताला शांतीचे प्रतीक मानल्या जाते.विश्र्वशांतीची सुरूवात भारतानेच केली आणि पुढेही विश्र्व शांतीची जोत भारताकडून अशीच प्रज्वलित होत राहील हे आपल्याला जी-२० शिखर परिषदेवरून लक्षात येते.आज जगात शांती कशी प्रस्थापीत करता येईल याकडे भारताचे संपूर्ण लक्ष आहे. भारत हा देवी-देवता,ऋषि-मुनी,साधु-संत,ज्ञानी, थोर महात्म्ये, क्रांतिकारक,जहालवादी-मवाळवादी अशा अनेक विचारवंतांच्या प्रयत्नाने बनलेला जगाच्या पाठीवरील एकमेव देश भारत आहे.त्यामुळे जगात शांतता कशी प्रस्थापीत करता येईल याचा अभ्यास करण्याकरिता संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे नेहमीच असते.कारण जगाच्या पाठीवर भारताचा उगम शांतता प्रस्थापित करण्यासाठीच झाला असावा.त्यामुळे गंगा,कावेरी, गोदावरी, नर्मदा, यमुना, वैनगंगा,तापी, कृष्णा इत्यादी नद्या सुध्दा शांतीचे द्योतक मानले जाते.भारताने नेहमी शांततेचा पुरस्कार केला आहे आणि करीत राहिल.गौतम बुध्दासारख्या महाज्ञानी यांनी भारतात शांतीची जोत प्रज्वलीत केली व संपूर्ण जगभर फीरवीली.मर्यादा पुरूषोत्तम राम यांनी सुध्दा शांततेचा पाठ संपूर्ण जगाला शिकवणीला व इस्लामिक धर्मगुरू महम्मद पैगंबर यांनी सुध्दा विश्र्व शांती करीता मोठे अभियान छेडले होते त्याचप्रमाणे शिख गुरू गुरूनानक देवजी यांनीही शांती प्रस्थापित करण्यासाठी मोलाची कामगिरी केली.पुर्वी आणि आताही विश्वात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत अग्रेसर होता आणि आहे.यात तिळमात्र शंका नाही.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.चीनने जगात नेहमीच अशांतीचे वातावरण निर्माण करून वेळोवेळीतिसऱ्या महायुद्धाची आहाटनिर्माण केली आहे. जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत संपूर्ण ताकद लावीत आहे तर चीन शांती भंग करण्याच्या तयारीत आहे.परंतु भारताचे काम शांततेने होत नसेल तर भारतही उग्ररूप धारण करून चीनला पटकनी देवु शकते.मानवाचा जन्म शांतता प्रस्थापित करण्यासाठी व जिवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी झाला आहे.परंतु चीन कुत्रे, मांजर, चामगाधड, पाल,साप,जे भेटेल ते खातात त्यामुळे आज चीनची बुध्दी कुत्र्यासारखी झाली आहे.त्यामुळे चीनने जर शांती भंग केली तर कुत्ते की मौत मारा जायेगा ही बाब चीनने लक्षात ठेवली पाहिजे.कारण वेळ पडल्यास तैवान चीनला सूध्दा भारी पडु शकतो. जगात आतंकवाद दिवसेंदिवस वाढत होता यामुळे जगातील संपूर्ण देशात भीतीचे वातावरण निर्माण होवून शांती भंग होत होती.शेवटी संपूर्ण जगाला शपथ घ्यावी लागली की जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी आतंकवाद्यांचा खात्मा होणे गरजेचे आहे.त्या पध्दतीने प्रत्येक देशांनी आतंकवाद्यांविरूध्द कारवाईला सुरुवात केली.कारण प्रत्येक देश आतंकवाद्यांच्या कारवाईने त्रस्त होते आणि आहे.परंतु संपूर्ण विश्र्वाला वाटायला लागले की आतंकवाद्यांचा नायनाट केल्याशिवाय जगात शांतता प्रस्थापित होवुच शकत नाही.त्या अनुषंगाने आज प्रत्येक देश शांततेसाठी आतंकवाद्यांचा खात्मा करण्यास दृढ संकल्प असल्याचे दिसून येते.परंतु चीनने जगात करोणा संक्रमनपसरवून लाखो लोकांचा जीव घेतला व करोडो लोकांचा जीव धोक्यात टाकला आणि विस्तारवादी नियतीचा अवलंब करून हिटलर प्रमाणे जगावर राज करण्याची स्वप्ने शि.जिनपिंग पहात आहे.चीनचे धोरण आहे की शेजारी राष्ट्रांची जमिन हडप करून सुपर पावर बनण्याची स्वप्ने पाहत आहे.सध्याच्या परिस्थितीत भारत-चीनची सेना आमने-सामने आहेत.तरीही भारताने शांतीचा मार्ग अजुनही सोडलेला नाही. चीन शांतता हा शब्द समजत नसेल तर त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सेना नेहमीच सज्ञ असते. सध्याच्या परीस्थितीत चिनच्या विस्तारवादी नितीमुळे विश्र्व शांती भंग होण्याच्या मार्गावर आहे. चीन-तैवान संघर्ष लक्षात घेता चायना सी मध्ये चीनला टक्कर देण्यासाठी अमेरिकेसह नाटो सेना सज्ञ झाली आहे त्याचबरोबर जापान व ऑस्ट्रेलियाने सूध्दा कंबर कसली आहे. म्हणजेच सध्याच्या परिस्थितीत जगातील शांती भंग करण्याचे काम चीन करीत आहे.याचे प्रायचीत्य संपूर्ण जगाला भोगावे लागु शकते. जगात शांती प्रस्थापित व्हायची असेल तर चीनला त्याची जागा दाखवावीच लागेल.चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे संपूर्ण जगात अशांतीचे वातावरणनिर्माण झाले आहे.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी अनेक धर्माचे,जातीचे,पंथाचे व अनेक भाषा बोलणारे लोक रहातात. भारताने नेहमीच शांतीचा पुरस्कार केला आहे.परंतु भारताशेजारी गद्दारांची फौज उभी ठाकली आहे.एकीकडे पाकिस्तानचा आतंकवाद, बांग्लादेशचा जातीयवाद, म्यानमारची घुसखोरी व चीनची विस्तारवादी नीती यामुळे भारताने सुध्दा जशास तसे उत्तर देण्याचे ठाणले आहे.भारत नेहमी शेजारी राष्ट्रांसोबत शांती प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असतो. परंतु भारताचा जीवलग मित्र समजल्या जाणाऱ्या नेपाळनेसुध्दा चीनचे पाय चाटण्याचे काम करीत असतो व भारताच्या पाठीत खंजर खुपसण्याचे काम करतो हे आपण मागे पहाले.अशाप्रकारे भारता शेजारचे संपूर्ण राष्ट्रांना चीन आर्थिक मदत करून आपला कब्जा करून सैन्य सामुग्री व एअरबेस तयार करण्याच्या तयारीत आहे.आज विश्र्व शांति टिकवून ठेवण्यासाठी अती लोकसंख्या असलेल्या देशांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. जगाच्या पाठीवर लोकसंख्येच्या बाबतीत चीन नंतर भारताचा नंबर लागतो.परंतु भारताच्या भुभागाचा विचार केला तर जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसून येते.त्यामुळे भारताला शांती प्रस्थापित करण्याकरिता एक पाऊल पुढे टाकूनहम दो हमारा एकही मोहीम राबवुन लोकसंख्या नियंत्रणात आणाली पाहिजे.आज चीनी चांडालच्या घृनीत कृत्यामुळे व युध्द सामुग्रीच्या चढाओढीमुळे प्रत्येक देश अनेक द्वीधेमध्ये असल्याचे दिसून येते.या द्वीधेपासुन मुक्ती मिळवायची असेल तर प्रत्येक देशांनी अणुचाचण्या, घातक हतीयार, मिसाईल परीक्षण, अणुबॉम्ब व करोणासारखे व्हायरस तयार करने इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.तेव्हाच विश्र्वात शांती प्रस्थापित होवु शकते.आज संपूर्ण जगाला ग्यात आहे की विश्वामध्ये शांति प्रस्थापित करायची असेल तर भारताचा सहयोग अती आवश्यक आहे.आज युक्रेन-रशिया व हमास-इजरायल संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी भारत शांतता प्रस्थापित करण्यासाठी अग्रेसर आहे.परंतु आज संपूर्ण जग चीनच्या विरोधात भारतासोबत उभा आहे.त्यामुळे चीनने लक्षात ठेवले पाहिजे की युध्द हे कोणत्याही प्रकारचे समाधान राहुच शकत नाही.विश्वशांतीच्या बाबतीत भारत काय आहे हे विश्र्वाला महात्मा गांधींनी दाखवून दिले आणि आज १४० कोटी भारतीयांच्या छत्रछायेच्या माध्यमातून भारत विश्र्व शांतीचा मसिहा बनल्याचे दिसून येते.कारण प्रत्येक देशाला शांतीची गरज आहे.जगाच्या पाठीवर भारताने अनेक उतार-चढाव पाहीले आहेत.यातुनच शांतीचा उगम झाल्याचे दिसून येते.भारताची संस्कृतीच शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाली आहे.त्रेतायुग व्दापरयुग,सत्ययुग आणि कलयुगात सुध्दा भारतीय संस्कृतीने संपूर्ण जगाला शांततेची शिकवण दिली आहे.भारत भुमित महाभारत, रामायण इत्यादी ज्या घटना घडल्या त्या सर्व विश्र्व शांती करीता होत्या ही बाब संपूर्ण जगाने लक्षात ठेवली पाहिजे.भारतातुन जगात जो ही संदेश जातो तो विश्र्व शांती करीता असतो.भारताने पाकिस्तानला शांततेसाठी हजारो वेळा समजविले.परंतु त्यांच्या नसानसात व रक्तात क्रुरता स्पष्ट दीसुन आली. त्यामुळेच पाकिस्तानात आतंवाद उफाळलेला आहे व तो स्वतः रक्ताच्या लाथोळ्यात अडकल्याचे दिसून येते. त्यामुळेच पाकिस्तानपासुन इस्लामीक देशांसह इतर देश अलग-थलग पडल्याचे दिसून येते.विश्व शांती म्हणजे मानसिक सुख नसुन वन्यप्राणी,जीव-जंतु,जंगल संपदा, निसर्गाचे संतुलन, पृथ्वीचे संरक्षण या संपूर्ण बाबींवर योग्य नियंत्रण ठेवुन त्यांची जोपासना केली तर विश्वामध्ये आपोआप शांती नांदायला सुरूवात होईल. विश्र्व हेची माझे घरही भुमिका जगातील प्रत्येक देशांनी व व्यक्तीने जोपासली पाहिजे.आज संपूर्ण जग प्रदुषणामुळे, अनेक आजारामुळे,युध्दजन्य परीस्थितीमुळे जगातील प्रत्येक व्यक्ती त्रस्त आहे.याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे.विश्वामध्ये शांती प्रस्थापित करण्यामागे भारताचा सर्वधर्मसमभाव हा मुलमंत्र सार्थक ठरत आहे.कारण भारतात हिंदू, मुस्लिम,शिख,ईसाई, बौद्ध, फारसी,ख्रिश्चन इत्यादी अनेक धर्माचा व देवी-देवतांचा वास नेहमी नांदत असतो.त्यामुळे विश्र्व शांतीच्या गंगेचा उगम भारतातुन झाल्याचे दिसून येते.या लेखाच्या माध्यमातून मी हेच सांगु इच्छितो की २१ सप्टेंबरला जगातील प्रत्येक व्यक्तीने शांतता प्रस्थापिकरण्यासाठी संकल्प करावा.जगातील देशांना मी आग्रह करेल की विस्तारवादीनीतीचा खात्मा करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.कारण विस्तारवादी नीती संपूर्ण जगाला घातक आहे.जगात भारताला विश्वशांतीचे उगमस्थान, दुत, आधारस्तंभ अशा अनेक उपमा दिल्या आहेत.याची जानीव चीनने ठेवली पाहिजे.करोना काळापासून संपूर्ण जग नमस्कार करायला लागले आहे हे सुद्धा भारतीय संस्कृतीचे शांतीचे प्रतीक आहे.सध्याच्या परिस्थितीत गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध,हमास-इजरायल युद्ध आणि चीन-तैवानचा वाढता संघर्ष टोकाला पोहोचले आहे याला शांत करण्यासाठी भारत अग्रेसर आहे हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. जगाला यशाकडे वाटचाल करायची असेल तर शांतीचा मार्गअवलंबावाच लागेल मग तो कोणताही देश असो.२१ सप्टेंबर विश्र्व शांतीदिवस लक्षात घेता जगातील प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी वृक्षारोपण करून शांतीचा संदेश संपूर्ण जगाला दिला पाहिजे.

*******

य हिंद!

लेखक

रमेश कृष्णराव लांजेवार

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

# डावपेच, रणनीती आणि बरेच काही

केजरीवाल यांनी आतिशी यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घातली आहे. तरी हरियाणा निवडणूक अर्ज भरण्याची तारीख संपल्यानंतरच केजरीवाल यांना जामीन का मिळाला याचा ऊहापोह करणे गरजेचे आहे.

मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी केजरीवाल यांना २१ मार्च २०२४ रोजी अंमलबजावणी संचालनालयाने ताब्यात घेतले होते आणि १३ सप्टेंबर रोजी २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन दिला. न्यायालयाने जामीन मंजूर करताना केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयची ज्या पद्धतीने कानउघाडणी केली ती सत्ताधार्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे. सीबीआयने पिंजर्यातला पोपट बनून राहण्यापेक्षा सीबीआय पोपट नाही, ही बाब अधोरेखित करण्याची गरज असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. काहीही असो! मात्र, यामागची कथा हनुमानाच्या शेपटीसारखी लांबच लांब आहे. ईडीच्या ताब्यात असलेले केजरीवाल यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. हा जामीन मिळाल्यानंतर सीबीआयने त्यांना अटक केली. सर्वोच्च न्यायालयाने यातूनही केजरीवाल यांना जामीन दिला आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती ती १२ सप्टेंबर आणि केजरीवाल यांना जामीन मिळाला १३ सप्टेंबर रोजी. कदाचित यालाच सत्तेचे डावपेच म्हटले जात असावे! सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांच्या याचिकेवर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर ५ सप्टेंबर रोजी आपला निर्णय राखून ठेवला होता. याबाबत चर्चा अशी आहे की, हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीपासून केजरीवाल यांना लांब ठेवणे हा सत्ताधारी पक्षाचा मुख्य हेतू होता, असा आरोप काँग्रेसकडून केला जात आहे. हरियाणात काँग्रेस-आपची आघाडी व्हायला नको असं सत्ताधारी पक्षाला वाटत होतं म्हणून त्यांनी केजरीवाल यांना उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख निघून जाईपर्यंत तुरुंगात ठेवण्यासाठी जाळं विणलं, असाही आरोप आहे. काँग्रेस आणि आपच्या आरोपात किती तथ्य आहे? याबाबत तेच सांगू शकतील. परंतु, अर्ज भरण्याची तारीख निघून गेल्यानंतर केजरीवाल यांना जामीन मिळाला हे सत्य आहे. विरोधकांच्या आरोपात तथ्य असले तरी हरियाणाच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला याचा फायदा होईल काय? हा खरा प्रश्न आहे. दिल्लीच्या मद्य धोरण घोटाळाप्रकरणी आतापर्यंत केजरीवाल यांच्याव्यतिरिक्त मनीष सिसोदिया, खासदार संजय सिंग आणि विजय नायर यांना जामीन मिळाला आहे. सिसोदिया १७ महिने तुरुंगात होते. संजय सिंग यांनी सहा महिने तुरुंगात काढले. तर विजय नायर २३ महिन्यांसाठी तुरुंगात होते. आता हे चारही नेते बाहेर आले आहेत. याशिवाय याच प्रकरणात तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांची कन्या के. कविता यांनाही जामीन मिळाला आहे.

दिल्ली सरकारने 'दिल्ली उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२' लागू केले होते. या मद्य धोरणाच्या अंमलबजावणीत कथित अनियमितता झाल्याच्या तक्रारी मिळाल्यानंतर नायब राज्यपालांनी सीबीआय चौकशीची शिफारस केली होती. आम आदमी पार्टीच्या नेत्यांनी बेकायदेशीरपणे पैसे कमवण्यासाठी हे धोरण आखले होते, असा आरोप आहे. सीबीआयनुसार, केजरीवाल यांनी 'साउथ ग्रुप'ला शंभर कोटी रुपयांची मागणी केली होती. यातील ४५ कोटी रुपये २०२२ मध्ये झालेल्या गोवाच्या निवडणुकीत वापरले. या प्रकरणात दिलासा मिळालेल्या नेत्यांमध्ये राज्यसभेचे खासदार संजय सिंग यांचा समावेश आहे. ईडीने सिंग यांना ४ ऑक्टोबर २०२३ रोजी या प्रकरणात अटक केली होती. डिसेंबर २०२२ मध्ये पहिल्यांदा त्यांचे नाव पुढे आले होते. ईडीनुसार, दिनेश अरोरा यांनी दिलेल्या कबुलीजबाबानुसार ते आधी संजय सिंग यांना भेटले आणि नंतर एका रेस्टॉरंटमध्ये पार्टी दरम्यान मनीष सिसोदिया यांना भेटले होते. संजय सिंग यांच्या सांगण्यावरूनच दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी सिसोदिया यांना पैसे देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दिनेश अरोरा सिसोदिया यांच्याशी पाच-सहा वेळा बोलले आणि संजय सिंग यांच्यासोबत केजरीवाल यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती, असा दावा ईडीने आरोपपत्रात केला आहे. संजय सिंग यांनी तब्बल १८० दिवस तिहार तुरुंगात काढल्यानंतर त्यांना जामीन मंजूर झाला होता. सर्वोच्च न्यायालयाने २ मार्च २०२४ रोजी जामीन दिला. काँग्रेस नेते आणि अधिवक्ता मनू अभिषेक सिंघवी यांनी सिंग यांची बाजू कोर्टात मांडली. ईडीने या प्रकरणात अटक केलेल्या आप नेत्यांमधील केजरीवाल यांच्यानंतरचे दुसरे मोठे नाव म्हणजे मनीष सिसोदिया. सिसोदिया यांना १० मार्च २०२३ रोजी अटक करण्यात आली होती. यापूर्वी, अर्थात ईडीने अटक करण्यापूर्वी त्यांना सीबीआयने २६ फेब्रुवारी २०२३ रोजी अटक केली होती. दिल्ली मद्य घोटाळाप्रकरणी सीबीआय आणि ईडीने सिसोदिया यांना आरोपी बनवले होते. सीबीआयने मनीष यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत आणि ईडीने मनी लाँडरिंग कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. मनीष सिसोदिया जवळपास १७ महिने तुरुंगात होते. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ९ ऑगस्ट रोजी जामीन मंजूर केला. या प्रकरणाची सुनावणीवेळी न्यायालयाने तपास संस्थेला विचारले की, या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असेल तर मग खटला का सुरू केला गेला नाही? खटल्याशिवाय शिक्षा देता येणार नाही, असे म्हणत न्यायालयाने सिसोदियांना जामीन मंजूर केला. यंदाच्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ईडीने केजरीवाल यांना जेव्हा अटक केली तेव्हा अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी दिल्ली न्यायालयात सांगितले होते की, पीएमएलए अंतर्गत आरोपीला अटक करण्यासाठी पूर्वनिर्धारित गुन्ह्यात आरोपी असलाच पाहिजे असे आवश्यक नाही. एप्रिलमध्ये सीबीआयने केजरीवाल यांना चौकशीसाठी बोलावले. त्यांच्या वकिलांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की त्यांची चौकशी आरोपी म्हणून नव्हे तर साक्षीदार म्हणून करण्यात आली. सीबीआयने २०२२ मध्ये मद्य धोरण प्रकरणात भ्रष्टाचाराचा गुन्हा नोंदवला तेव्हा केजरीवाल यांना आरोपी बनवण्यात आले नाही. ईडीने आपल्या आरोपपत्रात घोटाळ्याचा सूत्रधार म्हणून केजरीवाल यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. तर, सीबीआयने २९ जुलै रोजी दाखल केलेल्या अंतिम आरोपपत्रातही केजरीवाल यांच्या नावाचाही समावेश केला होता. मात्र, लोकसभा निवडणुकीत पक्षाचा प्रचार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने १० मे रोजी केजरीवाल यांना १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला होता. २ जून रोजी त्यांनी आत्मसमर्पण केले होते. तब्बल १५० दिवस तुरुंगात घालविल्यानंतर केजरीवाल यांना १३ सप्टेंबर रोजी न्यायालयाने जामीन मंजूर केला. न्या. सूर्यकांत आणि न्या. उज्ज्वल भुईया यांच्या खंडपीठाने हा आदेश देताना या प्रकरणाची सुनावणी नजीकच्या काळात पूर्ण होण्याची शक्यता नसल्याचे सांगितले. न्यायालयाने सांगितले की, केजरीवाल जामिनासाठी तीन निकष पूर्ण करतात. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सीबीआयची अटक वैध मानली परंतु न्यायमूर्ती भुयान यांनी असहमती दर्शवली आणि अटकेच्या वेळेवर प्रश्न उपस्थित केला. न्यायालयाने केजरीवाल यांच्यावर या प्रकरणी सार्वजनिकरित्या कोणत्याही प्रकारचे भाष्य करू नये अशी अट लादली आहे. २ सप्टेंबर रोजी आपचे माजी संपर्क प्रभारी विजय नायर यांनाही जामीन मंजूर केला. ते २३ महिने कोठडीत होते. दिल्लीच्या कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणात आता फक्त माजी आरोग्य मंत्री सत्येंद्र जैन तुरुंगात आहेत. ईडीने त्यांना ३१ मे २०२२ रोजी अटक केली होती. सीबीआयने २४ ऑगस्ट २०१७ रोजी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारावर सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध मनी लाँड्रिंग प्रकरणात एजन्सीने तपास सुरू केला होता. १४ फेब्रुवारी २०१५ ते ३१ मे २०१७ या कालावधीत त्यांनी अनेक लोकांच्या नावे जंगम मालमत्ता खरेदी केल्याचा आरोप एजन्सींनी केला आहे. सत्येंद्र जैन सध्या मे २०२२ पासून तिहार तुरुंगात बंद आहेत. मात्र, त्यांना अनेक वेळा अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# आपल्या राष्ट्राच्या हितासाठी:

सरकारने भारतातील सर्व धर्मांच्या सार्वजनिक रस्त्यावरील मिरवणुका, राजकीय पक्षांच्या विजयी मिरवणुका,त्यांचे रोड शो,ध्वनिक्षेपकांचा आवाज, लोकांच्या लग्नाच्या सार्वजनिक रस्त्यावरील मिरवणुका आणि फटाक्यांच्या शो वर बंदी घातली पाहिजे.सरकारने सार्वजनिक रस्त्यावर संगीतमय मिरवणुकांवर बंदी घातली पाहिजे.अशा प्रकारच्या मिरवणुकांमुळे त्रास निर्माण होतो आणि समाजात अराजकता. मिरवणुकीमुळे रुग्णवाहिका,शाळेत जाणारी मुले,कार्यालयात जाणारे कर्मचारी,कामगार स्त्री-पुरुष,पादचारी आणि सामानाची वाहतूक करणारी वाहने यांना अडथळे निर्माण होतात.जास्त सामाजिक तणाव धार्मिक मिरवणुकीमुळे होतो.या मिरवणुका अजिबात उपयोगी पडत नाहीत.उलट पैशाची नासाडी होते,प्रचंड त्रास होतो,शारीरिक ऊर्जा खर्च होते,श्रम वाया जाते,महत्वाचा वेळ वाया जातो आणि विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होते.

या मिरवणुकांवर देशात बंदी घातली तर मी तुम्हाला खात्री देतो की,या देशातील ५० टक्के सामाजिक, धार्मिक,राजकीय अराजकता संपुष्टात येईल.

चीन हा आपला शेजारी देश आहे.तो देश तेथे कोणत्याही प्रकारची मिरवणूक काढू देत नाही. त्यामुळे येथे सामाजिक आणि धार्मिक तणाव निर्माण होत नाही,सामाजिक समस्या निर्माण होत नाही.म्हणून चीन हा देश सर्वच क्षेत्रात जगात अग्रेसर आहे आणि राहील.भारत देश सामाजिक आणि धार्मिक तणावाने आजारी आहे.

मला माहित आहे की, बहुतेक लोक या तर्कशुद्ध विचाराशी सहमत होणार नाहीत आणि भाष्य ही करणार नाही.पण वरील विचार आणि सूचना राष्ट्रहिताचे आहे.

***********

बलदेव आड़े

(९८९०९१४४८०)

# संदीप भाऊ मोरे एक खरा समाजसेवक.



वंचित बहुजन आघाडी प्रभाग क्रमांक – ४ चे अध्यक्ष संदीप भाऊ मोरे , एक तळागाळातील व गरीब जनतेच्या विविध समस्या सोडवण्यासाठी अविरतपणे काम करणारा एक खरा समाजसेवक म्हणून ओळखला जातोय.

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर साहेब व पुणे शहर उपाध्यक्ष श्री.हिरामण भाऊ वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वंचित बहुजन आघाडी वाघोली प्रभाग क्रमांक – ४ चे सर्व पदाधिकारी व अध्यक्ष एक उल्लेखनीय कार्य करीत असल्याचे चित्र दिसत आहे. वाघोली गावातील बऱ्याच गोष्टींची सुधारणा व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी संदीप भाऊ मोरे यांनी अविरतपणे कार्य केले.

सामान्य जनतेचे विविध प्रश्न असतील , जनतेवर होणारा अन्याय अत्याचार असेल , सामाजिक काही अडी अडचणी असतील तर सगळ्यांच्या मदतीला धावून येणारा एक समाजसेवक म्हणून संदीप भाऊ मोरे यांच्याकडे पाहिलं जात आहे.

संतोष कदम, वाघोली

# तीन सराईत गुन्हेगाराना लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार). पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई

लातूर :– तीन सराईत गुन्हेगाराना लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार). पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई*

याबाबत याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण, तसेच लातूर शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या सराईत तीन गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीची (तडीपार) कारवाई करण्यात आली आहे.

हद्दपारची कारवाई करण्यात आलेल्याचे नावे

१) राहुल चंद्रकांत वाघमारे, वय ३१ वर्ष, राहणार म्हाडा कॉलनी, लातूर.

२) आकाश भगवान काळे, वय २८ वर्ष, राहणार काळे गल्ली, लातूर.

३) रणजीत दयानंद कांबळे,वय २८ वर्ष, राहणार महाराणा प्रताप नगर,बाभळगाव रोड, लातूर.

असे असून नमूद आरोपींतावर सन २०१४ ते २०२४ कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे हद्दीमध्ये टोळी तयार करून समाजविघातक कारवाया करणे, परिसरातील व्यावसायिक व रहिवासी लोकांच्या मालमत्तेला इजा पोहोचून भय निर्माण करणे, प्राणघातक शस्त्र वापरून जबरीचोरी, चोरी करणे, रात्री अपरात्री रस्त्यावरील वाहने अडवून लुटणे, आजन्म कारावास किंवा अन्य करावासाचे शिक्षेस प्राप्त असलेले गुन्हे करणे, शांतता भंग करणे, यासारखे गंभीर गुन्हे दाखल असून त्याच्यामुळे सामाजिक शांतता धोक्यात आली होती.

जिल्ह्यात शांतता अबाधित राहावी. याकरिता नमूद सराईत गुन्हेगारां कडून कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य घडू नये, याकरिता लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार मालमत्ता विषयी व शरीराविषयी गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करून सामाजिक शांतता करणाऱ्या गुन्हेगाराना ०१ वर्षासाठी लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात आले असून नमूद गुन्हेगारांना लवकरच लातूर जिल्ह्याच्या हद्दीच्या बाहेर सोडण्यात येणार आहे.

नमूद आरोपी विरुद्ध उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर सोहेल शेख, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीणचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अरविंद पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले,पोलीस अमलदार प्रदीप स्वामी यांनी सविस्तर हद्दपार प्रस्ताव तयार करून पाठवले होते. त्यावर पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्याकडे पाठविले होते. त्यावर पोलीस अधीक्षकांनी सदर प्रस्तावांचे अवलोकन करून नमूद आरोपी मुळे सामाजिक शांततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने व आगामी काळात होणारे निवडणुका व सण–उत्सव अनुषंगाने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ प्रमाणे कार्यवाही करून सदर सराईत गुन्हेगारांना लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात केले आहे.

सदर कारवाईच्या माध्यमातून गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत गुन्हेगार,उपद्रवी लोकांवर जरब बसवण्यासाठी गुन्हेगाराला जिल्ह्यातून हद्दपार केल्यामुळे इतर गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यां गुन्हेगारांना चांगलाच दणका बसला आहे.

# अतिपावसामुळे कापूस, सोयाबीन व तुरीवर रोग अन अळींचा प्रादूर्भाव

## किनवट तालुका खरीप पिकांची वाढ खुट्न पाने पडलीत पिवळी

किनवट तालुक्यात झालेला मुसळधार पाऊस, अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, पिकांची वाढ खुंटलेली आहे. कापूस व सोयाबीनची पाने पिवळी पडली असून, बहुतेक भागातील कापसावर 'मर' रोगाचा, सोयाबीनवर 'करपा' रोगाचा तर तूर पिकावर पाने गुंडाळणा–या अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे उत्पादनात पट वेण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे वेवील तालुका वृणी कार्यालयाकडून या रोगांच्या व्यवस्थापनासाठी उपाय सुचविण्यात आले आहेत
वाढीच्या अवस्थेतील खरीप पिकांमध्ये विविध कीड व रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे
प्रादुर्भावाचे स्वरूप ओळखून वेळीच उपाययोजनांचा अवलंब करावा.बालाजी मुंडे, किनवट तालुका कृषी अधिकारी, बोधडी. कृषी मंडल अधिकारी उत्तम नखाते.

किनवट/शेख शौकत :–किनवट तालुक्यात कापूस पिकाचे पेरणी झालेले क्षेत्र ५१ हजार ७७४ हेक्टर आहे. सद्यस्थितीत कापूस पाते व बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. सततच्या पावसामुळे झाडाची वाढ खुंटलेली असून, पाने पिवळे पडलेले आहेत. सखल भागात पावसाचे व पुराचे पाणी साचून राहिल्याने कापूसाची बोंडे काळी पडून सडल्या गेली आहेत. अनेक भागातील कापसाची झाडे मलूल पडून सुकून वाळल्या जात आहेत. ही सर्व 'मर' रोगाची लक्षणे असल्यामुळे, शेतक–यांनी याच्या व्यवस्थापनासाठी २०० ग्रॅम युरीयामध्ये १०० ग्रॅम पोटॅश (००:००:५० खत) आणि २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तपार झालेल्या द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे झाडाभोवती टाकून अत्वळणी करण्याची शिफारस शेतक–यांना करण्यात आली आहे.



तालुक्यात सोयाबीन पिकाचे पेरणी झालेले क्षेत्र १६ हजार ४०५ हेक्टर आहे. सोयाबीन पीक हे शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीनची वाढ चांबलेली आहे. सततच्या पावसामुळे सोयाबीन पिवळे (क्लोरोसिस) पडले असून, यावर 'करपा रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे. या करपा रोगाच्या नियंत्रणासाठी टेब्युकोनॅझील १० टक्के, सल्फर ६५ टक्के (पूर्व मिश्रीत बुरशीनाशक) २५ ग्रॅम, १० मिली वेंझोएट हे सर्व एकत्रितरित्या ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याचे कृषी कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. अन्यचा उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. तूर पिकाचे पेरणी झालेले क्षेत्र ७ हजार २३४ हेक्टर असून वाढीच्या अवस्थेत असलेल्या तूर पिकावर पाने गुंडाळणा या अळीच्या प्रादुर्भाव झालेला आहे. याच्या व्यवस्थापनासाठी पाच टक्के निबोळी अर्क किया क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याची शिफारस शेतकऱ्यांना करण्यात आली आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले लातूर जिल्ह्यातील १९ आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन

## महाविद्यालयातील युवक–युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी उपक्रम

लातूर :– महाविद्यालयीन युवक–युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आचार्य चाणक्य कोशल्य विकास केंद्र योजनाचे वर्धा येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये लातूर जिल्ह्यातील १९ महाविद्यालयातील कौशल्य विकास केंद्रांचाही समावेश आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचाही शुभारंभ करण्यात आला. वर्धा येथील कार्यक्रमात राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदींची उपस्थिती होती. लातूर येथील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी (कॉक्सिट) येथे झालेल्या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बालाजी मरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आले आहे. याअनुषंगाने १५ ते ४५ वयोगटातील युवक–युवतींना कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना राज्य शासनाने सुरु केली आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते या योजनेचा आज ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला. लातूर जिल्ह्यातील लातूर येथील ब्रीलीयंट महाविद्यालय, महिला बीसीए महाविद्यालय, जयक्रांती आर्टस् अँड कॉमर्स सिनियर कॉलेज, कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी (कॉक्सिट), एम.एस.बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्स एमआयएमएसआर मेडिकल कॉलेज अँड वाय.सी.आर. हॉस्पिटल कॅम्पस, कन्हेरी येथील मांजरा महाविद्यालय, मुरुड येथील संभाजी कॉलेज, चाकूर येथील डी. बी. कॉलेज ऑफ फार्मसी, हाडोळती येथील कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, चापोली येथील संजीवनी महाविद्यालय, उदगीर येथील मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ, शिवाजी महाविद्यालय, श्री हावगी स्वामी कॉलेज, निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय, औसा येथील कुमारस्वामी महाविद्यालय, अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालय, जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालय आणि शिरूर अनंतपाळ येथील शिवनेरी महाविद्यालयातील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे यावेळी उद्घाटन झाले. या सर्व महाविद्यालयांमध्ये दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक–युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक फायदा राज्यातील युवक–युवतींना व्हावा, या दृष्टीकोनातून राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयीन युवक–युवतींना रोजगारक्षम बनविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

# कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर? जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात



सध्या धावपळीच्या आयुष्यात अनेक जण आरोग्याकडे लक्ष देत नाही, त्यामुळे आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. मात्र, काही फिटनेसप्रेमी दररोज न चुकता जिमला जातात. खरं तर जिममध्ये दोन प्रकारचा व्यायाम केला जातो. एक म्हणजे कार्डिओ व्यायाम आणि दुसरा वेट ट्रेनिंग. पण, कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर हा प्रश्न अनेकांना पडतो. तुम्हालाही हा प्रश्न पडतो का? आज आपण याविषयी जाणून घेणार आहोत. खरं तर कार्डिओ आणि वेट ट्रेनिंग हे फिटनेसच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. या दोन्हींचे महत्त्व समजून घेतले तर त्याचा योग्य फायदा तुम्ही घेऊ शकता. कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर? कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर, याविषयी द इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने सविस्तर माहिती जाणून घेतली. पॉवरमॅक्सचे व्यवस्थापकीय संचालक संजय गोयल म्हणतात, वेट ट्रेनिंगपूर्वी किंवा नंतर कार्डिओ व्यायाम करणे हे त्या व्यक्तीचं ध्येय आणि ती व्यक्ती कोणत्या गोष्टीला प्राधान्य देते, यावर अवलंबून आहे. ते पुढे सांगतात, कार्डिओ व्यायाम हे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी, तसेच मानसिक आरोग्य जपण्यासाठी आणि कॅलरीज कमी करण्यासाठी एक चांगला पर्याय ठरू शकतो. वजन कमी करण्यासाठीसुद्धा हा व्यायाम अत्यंत फायदेशीर आहे.

वेट ट्रेनिंगसाठी अति ऊर्जेचा वापर केला जातो, पण त्यामुळे स्नायू अधिक मजबूत होतात. वेट ट्रेनिंगनंतर कार्डिओ केल्याने आपली कार्यक्षमता वाढते. गोयल सांगतात, वेट ट्रेनिंग केल्यानंतर कार्डिओ केल्याने स्नायू मजबूत होण्यास मदत होऊ शकते, पण वेट ट्रेनिंगमुळे थकवा येऊ शकतो ज्याचा थेट परिणाम कार्डिओ व्यायामावर होऊ शकतो. थकव्यामुळे तुमचा कार्डिओ व्यायाम काही वेळा अपूर्णसुद्धा राहू शकतो. आरोग्यतज्ज्ञ डॉ. मिकी मेहता सांगतात, मी गोयल यांच्याशी सहमत आहेत. थोडा वॉर्मअप केल्यानंतर कार्डिओ करा, ज्यामुळे तुम्ही चांगले वेट ट्रेनिंग करू शकता. कार्डिओ आणि वेट ट्रेनिंगचा क्रम का महत्त्वाचा? गोयल यांच्या मते, तुम्ही ज्या क्रमाने कार्डिओ आणि वेट ट्रेनिंग करता, त्याचा तुमच्या एकूण फिटनेस आणि स्नायूंच्या आरोग्यावर परिणाम होतो.

# म्हणून धोनी महिनाभर शाकाहारी झाला; मांसाहारी व्यक्तीने आहारात बदल केल्यास शरीरावर काय परिणाम होतो

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी क्रिकेट कारकिर्दीबरोबरच त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील तितकाच चर्चेत असतो. चाहत्यांना त्याची दैनंदिन दिनक्रिया जाणून घेण्यात फार उत्सुकता असते. निवृत्तीनंतर तो सध्या काय करतो, काय खातो, कुठे फिरतो या सर्व गोष्टी चाहत्यांना जाणून घ्यायच्या असतात. यात तुमच्यापैकी अनेकांना माहीत असेल की, धोनीला मांसाहारी पदार्थ खायला आवडतात. विशेषत: बटर चिकन हा त्याच्या सर्वात आवडता पदार्थ आहे. त्यामुळे धोनीचे मांसाहाराचे वेड कोणापासून लपून राहिलेले नाही; पण माजी भारतीय क्रिकेटपटू आणि सध्याचे क्रिकेट समालोचक आकाश चोप्रा यांनी धोनीच्या आहाराबाबत एक रंजक गोष्ट सांगितली आहे. आकाश चोप्रा यांनी एका यूट्यूब चॅनेलवर दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, एकेकाळी जेव्हा आकाश आणि धोनी दोघेही इंडिया ए संघाकडून खेळत होते, तेव्हा धोनी आकाश यांचा रुम पार्टनर होता. आकाशाने सांगितले की, मी शाकाहारी आहे पण धोनीला मांसाहार आवडतो हे मला माहीत नव्हते. यावेळी मी त्याला विचारले, काय जेवण ऑर्डर करू. ज्यावर तो म्हणाला की, तुला जे काही खायचे आहे ते ऑर्डर कर, मी देखील तेच खाईन. अशाप्रकारे काही न बोलता त्याने महिनाभर माझ्याबरोबर शाकाहारी जेवण खाल्ले. या मुलाखतीत आकाश चोप्रा यांनी धोनीने महिनाभर मांसाहार न करण्याचे कारणही सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, धोनी खूप लाजाळू होता, त्याने कधीही रूम सर्व्हिसला फोन केला नाही. तो इतका लाजाळू होता की, त्याने महिनाभर फक्त मी ऑर्डर केलेले शाकाहारी पदार्थ खाल्ले. पण, अशाप्रकारे एखाद्या मांसाहारी व्यक्तीने महिनाभर शाकाहारी आहार घेतल्यास त्याच्या शरीरावर काय परिणाम होईल याबाबत इंडियन एक्स्प्रेसने काही आहारतज्ज्ञांचे मत जाणून घेतले आहे. मांसाहार सोडून शाकाहारी जेवण खाण्याचा शरीरावर काय परिणाम होतो? मुंबईतील झायनोवा शाल्बी हॉस्पिटलचे आहारतज्ज्ञ जिनल पटेल यांनी सांगितले की, एखाद्या मांसाहारी व्यक्तीने अचानक महिनाभर मांसाहार खाणे बंद करून शाकाहारी जेवण खाल्ल्यास त्याच्या शरीरात मोठे बदल दिसून येतात. आहारतज्ज्ञ पटेल यांनी सांगितले की, जसा वेळ जातो तसतसे शरीरात बदल दिसू लागतात. शाकाहारी बनणे म्हणजे तुमच्या आहारात भाज्या, फळे, शेंगा, मसूर आणि तृणधान्यांचा समावेश करणे. हे पदार्थ फायबरसह अनेक पोषक तत्वांनी समृद्ध असतात. यामुळे पचनसंस्थेला चालना मिळते आणि तुम्हाला पोट जास्त वेळ भरल्यासारखे वाटते. याशिवाय तुमच्या रक्तातील साखरेची पातळीदेखील स्थिर राहते. मांसाहार करणारी व्यक्ती महिनाभर शाकाहारी पदार्थ खात असेल तर तिला रोज नवीन पदार्थ खाण्याची इच्छा होते. नवी दिल्लीतील



पीएसआरआय हॉस्पिटलच्या आपत्कालीन विभागाचे प्रमुख डॉ. प्रशांत सिन्हा म्हणाले की, आहारातील बदलाचा एक फायदा म्हणजे हृदय व रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधारते. तसेच शाकाहारी आहारामुळे सॅच्युरेटेड फॅट्स आणि कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका कमी होण्यास मदत होते. हाय फायबरमुळे पचनसंस्था सुधारण्यास मदत होते, यामुळे व्यक्तीला दिवसभर उत्साही आणि हलके वाटते. आहारतज्ज्ञ पटेल यांच्या मते मटण, चिकन किंवा मासे अशा मांसाहारी पदार्थांमध्ये सॅच्युरेटेड फॅट्स कमी असतात, ज्यामुळे त्वचेत काही चांगले बदल दिसून येऊ शकतात. तसेच त्वचा हायड्रेट बनते. एका महिन्यानंतर तुमच्या तोंडाची चव शाकाहारी अन्नपदार्थांशी जुळवून घेते. डॉ. सिन्हा म्हणाले की, मांसाहार करणाऱ्या व्यक्तीने अचानक शाकाहार करण्यास सुरुवात केल्यास अडचण निर्माण होऊ शकते. विशेषत: जे चिकन, मटण असे पदार्थ आवडीने खात असतील तर अशांना हा बदल त्रासदायक वाटू शकतो. अचानक शाकाहारी आहार करण्यास सुरुवात केल्यास तुमच्या शरीराची पुरेशा प्रमाणात प्रथिनांची गरज भागवता येत नाही. मसूर, चणे, टोफू आणि क्विनोआ यांसारखे पदार्थ प्रथिनांचे उत्कृष्ट स्त्रोत असले तरी त्यातून मांस किंवा माशांमधून मिळणाऱ्या प्रथिनांइतके प्रथिने मिळत नाहीत. अशाने शरीरात योग्य रीतीने समतोल न राहिल्यास थकवा किंवा स्नायूंचे नुकसान होऊ शकते. अशा परिस्थितीत शरीरात अमिनो सिडची पातळी राखण्यासाठी आहाराचे काळजीपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे, असेही डॉ. सिन्हा म्हणाले. मांसाहारातून शरीरास कोणते पोषक घटक मिळतात? यातील आणखी एक धोका म्हणजे मांसाहारातून मिळणारे व्हिटॅमिन बी १२, लोह आणि ओमेगा–३ फॅटी सिडस् यांसारखे पोषक घटक शाकाहारी पदार्थांमधून मिळत नाहीत. यामुळे शरीरात या घटकांची कमतरता निर्माण होऊ शकते. मांसाहारातून व्हिटॅमिन बी १२ मोठ्या प्रमाणात आढळते, जर शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची कमी निर्माण झाल्यास थकवा, अशक्तपणा आणि न्यूरोलॉजिकल लक्षणे दिसू शकतात. तसेच मांसाहाराच्या तुलनेत शाकाहारी पदार्थांमधून शरीरास हेम लोह पुरेशा प्रमाणात मिळणार नाही. नवी दिल्लीतील आकाश हेल्थकेअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे क्लिनिकल आहारतज्ज्ञ अदीबा खान यांनी सांगितले की, शाकाहारी आहारामुळे झोपेची गुणवत्ता आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. जर तुम्हाला वजन कमी करायचे असल्यास शाकाहारी आहार करणे फायदेशीर ठरू शकते. अशावेळी तुम्हाला मांसाहारी पदार्थ खाण्याची इच्छा होऊ शकते, पण खरंच तुम्ही मनापासून वजन कमी करण्याचा निश्चिय केला असेल तर मांसाहाराची इच्छा काही तासांपेक्षा जास्त काळ टिकणार नाही, असेही पटेल म्हणाले. हैदराबादमधील लकडी का पूल स्थित ग्लेनेगल हॉस्पिटल्सचे मुख्य आहारतज्ज्ञ, डॉ. भावना पी म्हणाल्या की, तुम्ही दीर्घकाळ संतुलित शाहाकारी आहार सेवन करत असाल तर वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते. तसेच जळजळ कमी होत शरीरास आवश्यक जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स प्रदान करत ताणतणाव कमी होतो. तुम्ही महिनाभर शाकाहारी आहार घेत असल्यास यामुळे पचनक्रिया आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. शरीरास सकारात्मक ऊर्जा मिळते, तसेच अनेक आरोग्य फायदे मिळतात. पण, शरीरास आवश्यक पोषक तत्वे मिळवण्यासाठी आहाराचे नियोजन व्यवस्थित करणे महत्त्वाचे आहे. अशावेळी तुम्ही आहारतज्ज्ञ किंवा डॉक्टरांचा सल्ला घेणे फायदेशीर ठरू शकते, असेही सिन्हा म्हणाले.

# उत्तम कलावंत आयुष्याच्या कार्यशाळेत घडतो ज्येष्ठ रंगकर्मी ॲड. शैलेश गोजमगुंडे

उत्तम कलावंत जीवनातील प्रत्येक क्षेत्रातील सूक्ष्म निरीक्षण करून आयुष्याच्या कार्यशाळेत घडत असतो असे प्रतिपादन जेष्ठ रंगकर्मी तथा सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक ॲड. शैलेश गोजमगुंडे यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन व एकदिवसीय कार्यशाळेत उद्घाटक म्हणून बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय दुर्वासराव गवई हे होते तर मंचावर सुप्रसिद्ध संगीतकार प्रा. शशिकांत देशमुख, समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. सिद्राम डोंगरगे, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर आणि नटराज्याचे पूजन करण्यात आले त्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले यावेळी महाविद्यालयातील संगीत विभागाच्यावतीने प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार, प्रा. सरस्वती बोरगावकर व संगीत चमुने स्वागत गीत सादर केले. पुढे बोलताना शैलेश गोजमगुंडे म्हणाले की, उत्तम



जीवन जगण्यासाठी कला ही अत्यावश्यक गोष्ट आहे. प्रत्येकाला कोणती तरी कला अवगत असणे हे त्याच्या आत्मिक सुखाच्या अनुभूतीसाठी नितांत महत्त्वाची आहे. कलावंत हा जाणीवपूर्वक घडवावा लागतो त्याच्या अंगीभुत गुण कौशल्यातून पुढे तो घडत जातो प्रगल्भ जाणिवेची रशिक्ता समाजामध्ये निर्माण करून समाजात जोपर्यंत सांस्कृतिक चळवळी वाढणार नाहीत तोपर्यंत समाजाची कलाक्षेत्राकडे पाहण्याची दृष्टी आणि दृष्टिकोन बदलणार नाही असेही ते यावेळी म्हणाले

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शशिकांत देशमुख म्हणाले की, संगीत ही विश्वाची भाषा आहे संगीत आणि मानवी जीवन समृद्ध होत असते कलावंतांनी अधिकाधिक सराव व परिश्रम केल्यास संगीत क्षेत्रातल्या जाणिवा समृद्ध होत जातील असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, संगीत या कला प्रकारात प्रचंड ऊर्जा शक्ती असते. वाद्यातून तयार होणारा नाद आत्मिक आणि मानसिक समाधान देतो. ग्रामीण भागात अनेक उत्तम कलावंत आहेत त्यांच्या कलांना वाव देण्याची नितांत आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले सूत्रसंचालन डॉ. राहुल डोंबे यांनी केले तर आभार प्रा. शैलेश कानडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ यशवंत वळवी, डॉ. जितेंद्र देशमुख, डॉ. मनोहर चपळे, प्रा. नागेश जाधव, डॉ गीता गीरवलकर, डॉ. अश्विनी रोडे, डॉ. किरण शिंदे, प्रा. भाग्यश्री वाघमारे, बालाजी डावकरे, संगमेश्वर मुळे आणि नंदू काजापुरे यांनी परिश्रम घेतले.

# केसर जवळगा ता.उमरगा येथील संपादक नाना शेख यांना उत्कृष्ट व निडर पत्रकार म्हणून शाह जमात यल्गार पुरस्काराने सन्मानित

## पुणे येथील मुस्लिम सामाजिक संघटना यांचा मानाचा पुरस्कार

पुणे :- केसर जवळगा ता.उमरगा जि. धाराशिव येथील रहिवाशी असून कामानिमित्त पुणे शहरात स्थायिक असलेले नाना शेख दैनिक जय हिंद महाराष्ट्र या दैनिकाचे संपादक म्हणून गेली अनेक वर्षे सातत्याने समाजाचे व सामाजिक विविध प्रश्न आरोग्य,शिक्षण,पाणी,रस्ते, अश्या अनेक विषयांना लेखणीच्या स्वरूपात वाचा फोडण्याचे काम अविरत चालू आहे.


आणि याचीच दखल घेऊन पुण्यातील उत्कृष्ट व निडर पत्रकार शाह जमात भोसरी या नामांकित सामाजिक संस्थेचा पुरस्कार म्हणून नाना शेख यांना सन २०२४ चा शाह जमात यांच्या वतीने सह मताने हा मानाचा शाह जमात यल्गार पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.दर वर्षा प्रमाणें आज भोसरी येथे आयोजित जश्ने ईद मिल्लादुन्नबी निमित्ताने शाह जमात यांच्या माध्यमातून विविध कार्यक्रम उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




या जश्नामध्ये सर्व जाती जमातीचे नागरिक व सर्व समाज प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम अतिशय दिमाखात पार पडला.मला हा मानाचा पुरस्कार देऊन प्रोत्साहन दिल्याबद्दल मी जमातचे अध्यक्ष शाह व मुख्य संयोजक युवा सामाजिक समाज सेवक मोहसिन भाई शाह यांचे मनापासून आभार मानतो धन्यवाद मानतो.सर्व भारतीयांना जश्ने ईद ए मिल्लादून्नब्बी निमित्ताने खुप खुप शुभेच्छा देतो.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायमस्वरुपी ७५ फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे करिता आपले मत नोंदवा मनपाचे आवाहन...

लातूर/प्रतिनिधी :- लातूर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायमस्वरुपी ७५ फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे करणे करिता आपल्या महानगरपालिकेच्या ाlश्ररींाी. ीस या संकेतस्थळावर व महानगरपालिका कार्यालयात, येथे वेगवेगळे असे ३ प्रकारचे मॉडेलच्या प्रतिकृतीचे संकल्पचित्र ठेवण्यात आले असुन महानगरपालिकेमध्ये ठेवलेल्या बंद पेटीमध्ये जॉंळेप १, जॉंळेप २ , जॉंळेप ३ पैकी




एक दिनांक २५.०९.२०२४ रोजी पर्यंत आपले मत कळवावे असे आवाहन आयुक्त, बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# भाजप नेत्या सौ.निर्मलाताई कांबळे यांच्या पाठपूराव्याने मा.खा.सुधाकरराव शृंगारे यांच्या निधितुन प्रभाग क्र.०१ च्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

लातूर :-- लातूर शहर पूर्व भागातील महिला भाजपा नेत्या निर्मलाताई कांबळे यांनी प्रभाग क्रमांक २ मधील भारत सोसायटी गवळी नगर भागात गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला कच्या रस्त्यामुळे नागरिकांना समस्या निर्माण होत होती सदरील नागरी समस्या दूर करण्यासाठी पूर्व भागातील महिला भाजपा नेत्या निर्मलाताई कांबळे यांनी लातूर चे माजी खासदार सुधाकरराव श्रुंगारे यांच्या कडे सतत पाठपुरावा करून या भागातील चार कच्चे रस्ते विकास कामाकरिता खासदार स्थानिक विकास निधीस मंजुरी मिळवली सदरील रस्त्यास प्रभागातील नागरिकांच्या हस्ते आज दि. २०सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री फळ फोडून उदघाटन करण्यात आले यावेळी उपस्थित भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सौ.रागिणीताई यादव,माजी नगरसेवक रविभय्या सुडे, मंडल अध्यक्ष प्रमोदभाऊ गुडे, सौ. रत्नमालाताई घोडके,भाजपा युवा नेता अरुण जाधव,अतिष कांबळे,सौ.रेखाताई टेंकाळे,शामल खराडे,पुर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे,प्रा.अनंत लांडगे,मन्मथ



स्वामी,कांबळे पोलिस,मांडी बोने,डॉ.कसबे, शुभम कांबळे,वैभव कांबळे,संतोष ताडमाडगे,शोभाबाई भुजबळ,सत्तार भाई,निखिल कसबे सह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

# महानगरपालिके मार्फत दंतशल्यचिकित्सा सुविधेस सुरुवात

## मनपा आरोग्य विभागाची शहरवासियांना अनोखी भेट

लातूर/प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत विविध आरोग्य विषयक सेवा सुविधा नागरिकाना दिले जातात. परंतु, यामध्ये दंतशल्यचिकित्सा उपलब्ध नसल्या कारणाने ही सेवा लातूर शहर वासियांना उपलब्ध करून देण्याचा मानस मनपा प्रशासनाचा होता. तसेच माईर्स पुणे चे महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च (दंत महाविद्यालय व रुग्णालय) लातूर चा उद्देश समाजातील शेवटच्या घटका पर्यंत दंत चिकित्सा सुविधा पुरविणे आहे. त्यादृष्टीने आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मनपाच्या वतीने उपायुक्त(आरोग्य) डॉ पंजाब खानसोळे, आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती व प्राचार्य डॉ कांगणे यांनी योग्य ती प्रक्रिया पूर्ण करून दोन्ही संथांच्या सहकार्याने व परस्पर संमतीने नागरिकांसाठी दंतशल्यचिकित्सा सुविधा सुरु करण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आले आहेत या करारा अंतर्गत मनपातील चार(४) प्रा. आरोग्य केंद्र येथे अतिशय अल्प



दरात दंत चिकित्सा सुविधा तज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे. यामधे नियमित दंत तपासणीसोबतच स्केलिंग, रूट कॅनल, दात काढणे, दातात सिमेंट भरणे आदि सेवा देण्यात येणार आहेत. तसेच संदर्भीय सेवा या माईर्स येथील रुग्णालयात दात इम्प्लंट करणे, दंत कॅन्सर, गुंतागुंतीची शस्त्रक्रिया आदि सुविधा देण्यात येणार आहेत. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी यावेळी दंत महाविद्यालयाचे दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. तरी नागरिकांनी खालील नमूद केलेल्या चार ठिकाणी प्रा.ना.आ.केंद्र इंडिया नगर, प्रा.ना.आ.केंद्र गौतम नगर,प्रा. ना. आ. केंद्र तावरजा कॉलनी, मनपा दवाखाना काळे गल्ली या ठिकाणी दंतशल्यचिकित्सा सेवेचा लाभ दिनांक २३-९-२०२४ पासून सकाळी १० ते २ या वेळेत घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# मनोज जरांगेंची प्रकृती खालावली

जालना : मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे हे सहाव्यांदा उपोषणाला बसले आहेत. गेल्या चार दिवसांपासून त्यांचे उपोषण सुरु असून त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती मिळते आहे. विशेष म्हणजे त्यांच्या तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरांनीही त्यांना वारंवार उपोषण करण्यावरुन झापले आहे. डॉक्टरांनी जरांगेंच्या प्रकृतीची तपासणी केल्यानंतर त्यात रक्तातील शुगर वाढलेले दिसून आले आहे. यावरुन डॉक्टरांनी जरांगेंना वारंवार उपोषण करत असल्याने कडक शब्दांत सूचना केल्या. शुगर कमी होण्याऐवजी वाढली कशी? असा सवालही डॉक्टरांनी त्यांना केला. दरम्यान, मनोज जरांगे हे सध्या वर्षभरात सहाव्यांदा उपोषणला बसले आहेत. मराठा समाजाला ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण मिळावे ही त्यांची प्रमुख मागणी आहे. तसेच मराठा समाजाला सगेसोयरे या तत्वावर सरसकट आरक्षणाची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही त्यांनी लावून धरली आहे.

# लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद

## अभियंता दिन, मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

लातूर :- अभियंता दिन आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने बांधकाम भवन येथे आज रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. १०५ जणांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून प्रत्येकाने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता सर्वश्री देवेंद्र नीळकंठ, एम. एम. पाटील, गणेश क्षीरसागर, उप अभियंता संजय सावंत, वाहतूक पोलिस निरीक्षक गणेश कदम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

अपघातामधील जखमी किंवा इतर अनेक रुग्णांना रक्ताची आवश्यकता भासते. अशावेळी गरजूंना पुरेशा प्रमाणात रक्त उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी रक्तदान करणे आवश्यक आहे. लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाने शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित करून अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला आहे. प्रत्येक व्यक्तीने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामुळे आरोग्य विभागाला मदत होणार आहे.




शासकीय रक्तपेढीमध्ये मुबलक प्रमाणात रक्त उपलब्ध होण्यासाठी असे उपक्रम राबविले जाणे आवश्यक आहे. तसेच आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी केले. तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तकेंद्र विभागात रक्तदान करता येईल, असे त्यांनी सांगितले.

लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरासाठी जिल्ह्यातील बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, कंत्राटदार तसेच नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. त्यांच्या सहभागामुळे शासकीय रक्तपेढीमध्ये रक्तसंकलनाला हातभार लाभेल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख म्हणाले. तसेच या शिबिराचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

तसेच इतक्या व्यापक स्वरूपातील शिबीर आयोजित केल्याबद्दल विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांना सन्मानपत्र देण्यात आले. उपअभियंता संजय सावंत आणि राजेंद्र बिराजदार यांनी या शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शाखा अभियंता भास्कर कांबळे यांनी केले. यावेळी लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आईच्या स्मृती दिनानिमित्त लेखन साहित्य तथा खाऊचे वाटप

संग्रामपुर / प्रतिनिधी :- शिक्षण उपयोगी लेखन साहित्य व खाऊचे वाटप करून परघरमोल परिवारने अनोख्या पद्धतीने आपल्या आईचा स्मृतिदिन साजरा करत, समाजात एक वेगळा पायंडा समाजात घालून दिला.

सविस्तर वृत्त असे की दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी भिमराव परघरमोल (व्याख्याता तथा अभ्यासके फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जि. अकोला) यांच्या आईचा स्मृती दिन असतो. त्यानिमित्ताने त्यांचे सर्व भावंड आपल्या राहत्या मुळगाव, सावळा ता. संग्रामपूर जि. बुलढाणा येथे न चुकता दरवर्षी एकत्र येऊन, शेतात ज्या ठिकाणी आईला अग्नी देऊन तिच्या अस्थि पुरवलेल्या आहेत, त्या ठिकाणी बोधीवृक्षाचे झाड लावून पशुंसाठी तीन हजार लिटर पाण्याचा हौद बांधलेला आहे. त्या ठिकाणी ते सर्व वंदना घेऊन नतमस्तक होत असतात.



यावर्षी मात्र त्यांनी वेगळ्या पद्धतीने स्मृतिदिन साजरा करत जि. प. मराठी प्राथमिक शाळा सावळा येथील विद्यार्थ्यांना मिक्स वही, पेन, पेन्सिल, खोड रबर, व शार्पनर हे सर्व ठेवण्यासाठी एक पाऊच व खाऊचे पॅकेट देऊन, एक वेगळ्या पद्धतीने स्मृतिदिन साजरा करत; आपल्या आईला अभिवादन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक भाऊराव बांगर, कडू सर तसेच गावातील प्रतिष्ठित श्रीकृष्ण सपकाळ, विनोद वानखडे, प्रमोद सपकाळ यांच्यासह कुटुंबातील साहेबराव परघरमोल, वैभव परघरमोल, फुलावंती भिलंगे, शितल परघरमोल, अनुजा परघरमोल यांची उपस्थिती होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE